दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२ एप्रिल २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### राज्यातील आदिम जमातींकरिता राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु.आदिती तटकरेंचा पुढाकार

# रायगडमध्ये उभारणार आदिवासी बहुउद्देशीय संकुल

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती सुनिल तटकरे यांच्या पुढाकारातून तसेच सातत्यपूर्ण प्रयत्नातून जिल्ह्यातील सुधागड-पाली तालुक्यातील मौजे जांभूळपाडा येथे आदिम जमाती (PVTG) (कातकरी) यांच्याकरिता बहुद्देशीय संकुल उभारण्यासाठी शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे कु. आदिती तटकरे यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने अर्थसंकल्पात तशी घोषणा करण्यात आली होती.



या प्रकल्पाकरीता मौजे जांभूळपाडा ता. सुधागड येथे स.नं.१०६ क्षेत्र १९-७५-०० हे.आर एवढी शासकीय जमीन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहे. आदिवासी जमातीची कुटुंबे अतिदुर्गम व अविकसित अशा सीमाभागात राहत असल्यामुळे या कुटूंबांना जीवनावश्यक सोयी-सुविधा उपलब्ध होणे कठीण असते.

या प्रकल्पामुळे त्यांच्या मुलांना योग्य शिक्षण, आरोग्य तपासणी व उपचार, दैनंदिन आवश्यक अन्न किंवा वापर वस्तूंचा पुरवठा, मनोरंजन व करमणूक आणि त्यांच्या उपजीविकेवर आधारित व्यवस्था एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असून आदिवासी समाजाच्या प्रगतीस यामुळे चालना मिळणार आहे.

# राज्यावर दुसरं संकट; केवळ ५-६ दिवस पुरेल इतकाच रक्तसाठा शिल्लक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील करोनाच्या उद्रेकाचा परिणाम थेट रक्ताच्या साठ्यावर पडला असून राज्यात केवळ पुढील ५ ते ६ दिवस पुरेल इतकाच रक्तसाठा शिल्लक आहे. करोनासोबतच आता हे नवे आव्हान राज्य सरकारपुढे उभे ठाकले असून राज्यातील नागरिकांना आणि रक्तदानाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना रक्तदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यातील नागरिकांनी रक्तदानासाठी पुढे यावे असे आवाहन अन्न व औषध प्रशासन मंत्री राजेंद्र शिंगणे यांनी राज्यातील नागरिकांना केले आहे.

राज्यात करोनाचा शिरकाव झाल्यानंतर हळूहळू रक्तदानावर परिणाम होऊ लागला. त्यानंतर करोनाचा उद्रेक झाल्यानंतर हे काम जवळजवळ ठप्पच झाले. आता तर केवळ ५ ते ६ दिवस पुरेल इतकाच रक्तसाठा शिल्लक असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री राजेंद्र शिंगणे यांनी दिली आहे. राज्यातील शेकडो रुग्णालयांमध्ये नियमितपणे महत्वाच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. या शस्त्रक्रियांना रक्ताची अत्यंत आवश्यकता असते. जर रक्ताचा साठा वाढला नाही, तर अशा रुग्णांच्या जीवावर बेतू शकते. याचा विचार करून राज्य शासनाने नागरिकांना रक्तदान करण्याचे आवाहन केले आहे.

मागीलवर्षी देखील अनेकदा असा तुटवडा निर्माण झाला आहे. त्या-त्यावेळी रक्तदान वाढवून ती समस्या दूर करण्यात आली. आताही



५ ते ६ दिवस पुरेल इतरा, तर काही ठिकाणी १० दिवसांचा रक्तसाठा शिल्लक आहे. ही परिस्थिती लक्षात घेता राज्यात सर्व रक्तपेढ्यांनी आपला साठा वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत. त्याच प्रमाणे राज्यातील स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन रक्तदानासाठी प्रयत्न करावेत. शिवाय राज्यातील राजकीय नेत्यांनी आपापल्या विभागांमध्ये रक्तदानाची शिबिरे आयोजित करून हा रक्तसाठा वाढवावा, असे आवाहन राजेंद्र शिंगणे यांनी केले आहे.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून करोना बाधित रुग्णांची मोठी वाढ होत असून राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये मर्यादित स्वरुपाचे लॉकडाउन आणि कडक नियमावली लागू करण्यात आलेली आहे. इतकेच नाही, तर नागरिकांनी करोनाचे नियम काटेकोरपणे पाळले नाहीत, तसेच करोना बाधित रुग्णांची संख्या अशीच झपाट्याने वाढत गेल्यास सरकारला राज्यात लॉकडाउन लागू करण्याशिवाय पर्याय नसेल, असेही राज्य सरकारने स्पष्टपणे म्हटलेले आहे. या पार्श्वभूमीवर रक्तसाठा वाढवणे हे मोठे आव्हान असणार आहे.

## संक्षिप्त...

### ३०० किलो हेरॉईनसह एके ४७ चा साठा जप्त

**दै.रायगड नगरी । मुंबई**

चेन्नई झोनल नार्कोटिक्स कन्ट्रोल ब्युरो युनिटने मोठी कारवाई केली आहे. श्रीलंकेच्या एका बोटमधून ३०० किलो हेरॉईन ड्रग्स मोठया प्रमाणात आणि एके ४७ बंदुकी जप्त केल्या आहेत. या कारवाईचं कनेक्शन पाकिस्तानशी असल्याचं देखील समोर आलं आहे. चेन्नईच्या नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो युनिटला माहिती मिळाली की श्रीलंकेमधून एका बोटीमध्ये ड्रग्स आणि हत्यारं भारतात येणार आहेत. त्याप्रमाणे चेन्नई नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने भारतीय तटरक्षक दलात बरोबर सापळा रचला आणि श्रीलंकेमधून येणाऱ्या बोटीला ताब्यात घेतलं. ज्यामध्ये ३०० किलो हेरॉईन मोठ्या प्रमाणात हत्यारं होती. तसेच ६ श्रीलंकन नागरिकांना सुद्धा चेन्नई नार्कोटिक्सच्या टीमने अटक केली आहे.

श्रीलंके मधून रवीहंसी नावाची बोट भारतात येणार याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली होती. भारताच्या हद्दीत बोट येताच नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोची टीम आणि भारतीय तटरक्षक दलाच्या पथकाने त्या बोटला अडवलं. बोटची जेव्हा झडती घेण्यात आली तेव्हा संपूर्ण बोल पिवर असलेल्या पाण्याच्या टाकीमध्ये ३०१ पाकीटं मिळाली ज्यामध्ये सफेद रंगाची पावडर होती, जी कोकेन होती. पॅकेटवर घोड्याचे चित्र होतं. ड्रग्सच्या ब्रॅण्डिंगसाठी हे असे चित्र वापरण्यात येत असल्याचं चेन्नई नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोचे डायरेक्टर अमित घवाते यांनी सांगितलं. तर पाच एके ४७ आणि १००० गोळ्या सुद्धा चेन्नई एनसीबीने या बोटवरून जप्त केल्या आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली.

# पोलीसावर जीवघेणा हल्ला केलेल्या फरारी आरोपीस पनवेल गुन्हे शाखेकडून अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कर्तव्य बजावित असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला करून पसार झालेल्या आरोपीला पनवेल गुन्हे शाखेकडून खांदेश्वर रेल्वे स्टेशन रिक्षा स्टॉप येथून ताब्यात घेण्यात आले आहे. गेल्या दोन महिन्यांपासून हा आरोपी फरार असल्याने त्याची अटक महत्वाची मानली जात आहे.

३१ जानेवारी २०२१ रोजी रात्री ११.४५ वा. सुमारास नेरूळ पोलीस ठाणे येथे नेमणुकीस असलेले पो. शि. संतोष राठोड हे बालाजी मंदिर टेकडी सेक्टर २० नेरूळ येथून त्यांच्या चारचाकी वाहनाने जात असताना सदर ठिकाणी २० ते २५ वयोगटातील ५ इसम हे आरडाओरड करीत असताना आढळून आले होते. नमूद इसमांकडे एक विना नंबर प्लेट असलेली ऍक्टिवा मोटर सायकल होती. सदर मोटरसायकल बाबत पो. शि. राठोड यांनी विचारणा केली असता नमूद इसमानी हुज्जत घालण्यास सुरुवात केली. त्यावेळी पो. शि.राठोड यांनी मदतीसाठी नेरूळ बीट मार्शल यांना कॉल केला असता त्याचा राग मनात धरून पाचही इसमांनी पो. शि. राठोड यांना ते बजावीत असलेल्या शासकीय कामकाजामध्ये अडथळा आणून त्यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने हातातील दारूच्या बाटली पो. शि. राठोड यांच्या डोक्यावर फोडून, अर्धवट तुटलेल्या बाटलीने पुन्हा राठोड यांच्या तोंडावर वार करून त्यांना खाली पाडून दगडाने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून गंभीर दुखापत केली होती. तसेच राठोड यांच्या चार चाकी गाडीवर मोठे दगड टाकून गाडीच्या काचा फोडून नुकसान केले होते. सदर बाबत नेरुळ पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र.४३/२१कलम ३०७, ३५३, ३३३, ४२७, १४३, १४८, १४९ भा. द. वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर सदर गुन्हा पोलीस कर्मचाऱ्या वरील झालेल्या हल्ल्याबाबत असल्याने अप्पर पोलीस आयुक्त गुन्हे डॉ. शेखर पाटील, पोलीस उप आयुक्त गुन्हे प्रवीण पाटील, सहा. पोलीस आयुक्त ..../२

# पनवेल पालिकेची विशेष सर्वसाधारण सभा ही सर्व सदस्यांच्या उपस्थितीत सभागृहात घेण्याची मागणी

### विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांचे महापौरांना निवेदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल पालिकेची विशेष सर्वसाधारण सभा ही सर्व सदस्यांच्या उपस्थितीत सभागृहात घेण्याची मागणी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी महापौरांकडे निवेदनाद्वारे केली आहे. याआधी कोवीडमध्ये झालेल्या प्रत्येक सभेला पत्रकार हजर असायचे. तरी ज्याप्रमाणे लोकसभा, विधानसभा यामध्ये विविध अधिवेशन होतात त्यासाठी सर्व सन्मानीय सभासद हजर असतात, त्यामुळे आपण देखील हि विशेष सभा सत्ताधारी व विरो-धक सदस्यांना विचारात घेऊन जनतेचा जिव्हाळ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी हि सभा फिजिकल घ्यावी असे प्रितम म्हात्रे यांचे म्हणणे आहे.

मालमत्ता कराबाबत सर्वसाधारण ठराव क्र.११८ दि.१७ जानेवारी २०१९ रोजी सत्ताधारी ४६ नगरसेवक विरुध्द विरोधी



पक्षाचे २५ नगरसेवक अशा संख्याबळाने बहुमताने पारित करून घेण्यात आला. आघाडी म्हणून सदर मालमत्ता करास व ठरावास विरोधी पक्षाच्या कायम विरोध राहिला आहे. त्याचाच फलस्वरूपात २२ मार्च २०२१ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत विरोधी पक्षातील नगरसेवकांच्या माध्यमातून मालमत्ता कराविरोधात आंदोलन करण्यात आले, व महासभेत सत्ताधाऱ्यांची मालमत्ता कराबाबतची भूमिका स्पष्ट करावी व त्यासाठी जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी विशेष महासभा आयोजित करावी अश्या प्रकारची विरोधी पक्षाकडून मागणी करण्यात आली होती. त्यानंतरच सभागृह सोडण्याचा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे या सभेत तश्या प्रकारचे तोंडी आश्वासन महासभेत देण्यात आले.

जोपर्यंत मालमत्ता कराबाबत विशेष सभेचे आयोजन करणार नाही तो पर्यंत विरोधी पक्षातील नगरसेवक पालिकेच्या कुठल्याही सभेस हजर राहणार नाही व कुठली सभा हि घेऊ देणार नाही असे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी सांगितले होते. २४ मार्च २०२१ रोजीची स्थायी समिती सभा हि देखील विरोधी पक्षाच्या स्थायी ..../२

# माणगाव येथे विभागीय क्रीडा संकुल उभारणीसाठी क्रीडा विभागाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान

### पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या प्रयत्नाने क्रीडा संकुल स्थापण्याची प्रक्रिया शीघ्र गतीने

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्य क्रीडा धोरण-२००१ अंतर्गत कोकण विभागाचे विभागीय क्रीडा संकुल नवी मुंबई येथे उभारण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. परंतु नवी मुंबई परिसरात या संकुलासाठी आवश्यक शासकीय जागा उपलब्ध होणे शक्य न झाल्याने क्रीडा राज्यमंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या कल्पनेतून विभागाचे क्रीडा संकुल मध्यवर्ती झाल्यास कोकण विभागातील सर्वच खेळाडूंना याचा लाभ होईल, असा विचार पुढे आला. त्यानुषंगाने पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी केलेल्या अखंडित पाठपुराव्यामुळे जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील मौजे नाणोरे येथे विभागीय क्रीडा संकुल उभारण्यास शासनाची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्याचबरोबर हे क्रीडा संकुल उभारण्यासाठी रु.२ कोटी ४० लक्ष निधी जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड यांच्या अधिनस्त ठेवण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

मौजे नाणोरे येथील क्रीडा संकुलासाठी स.नं.१३०/० मधील १०.०० हेक्टर (२४ एकर) शासकीय जागा विभागीय क्रीडा संकुल, कार्यकारी समिती, मुंबई विभागाच्या नावावर करण्यात आली आहे. या संकुलासाठी रुपये त्र्याऐंशी कोटी चव्वेचाळीस लक्ष सोळा हजार रकमेच्या अंदाजपत्रक व आराखड्यास शासनाने मान्यता दिली आहे.

शासनाच्या मान्यताप्राप्त अंदाजपत्रकानुसार विभागीय क्रीडा संकुलामध्ये ४०० मी.सिंथेटीक धावनपथ, फुटबॉल मैदान, थलेटिक्स पॅव्हेलियन बिल्डिंग, हॉकी मैदान चेंजिग रूमसह, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, खो-खो, कबड्डी मैदाने, टेनिस कोर्ट, चेंजिंग रुप, आऊटडोर गेम, अंतर्गत रस्ते, इनडोअर हॉल, जलतरण तलाव, डायव्हींग तलाव, संरक्षण भिंत, मुले-मुली वसतिगृहे, रेन वॉटर ..../२

# पालीत जुगार अड्ड्यावर पुन्हा धाड ; तिघांविरोधात गुन्हे दाखल

**दै.रायगड नगरी । धम्मशील सावंत**

**पाली/बेणसे** : सुधागड तालुक्यातील पालीत बेकायदेशीर मटका जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने दि.(३१) बुधवारी सायंकाळी उशिरा धडक कारवाई केली. या कारवाईत मुद्देमाल जप्त करण्यात आला असून या प्रकरणातील तीन आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिन्याभरतील ही दुसरी कारवाई असल्याने जुगार व मटका व्यवसाईकांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

यासंदर्भात पाली पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पो.ह स्वप्नील येरूनकर यांच्या फिर्यादीनुसार पाली पोलीस स्टेशनच्या हद्दीत एस टी स्टॅण्ड ते पाली स्मशानभूमी कडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला असणाऱ्या झाडाजवळ विनापरवाना मटका जुगार व्यवसाय चालविला जात होता.

या प्रकाराची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पथकाने धाड टाकून मुद्देमाल जप्त केला. यामध्ये रोख रक्कम व इतर साहित्य असे एकूण २१७१० रुपयांचा समावेश आहे. या प्रकरणातील तीन आरोपींवर गु र नं ३३/ २०२१ , महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ नुसार कलम १२ - प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास पाली पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार श्रीराम खेडेकर अधिक तपास करीत आहेत.

# धामणदिवीजवळ कंटेनर कलंडला ; चालक जखमी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटामध्ये असलेल्या धामणदिवी गावालगत गुरूवारी पहाटेच्या सुमारास एक कंटेनर कोसळून काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. मात्र, कशेडी टॅप वाहतूक पोलीसांनी तातडीने एकेरी वाहतूक सुरू केल्याने महामार्गावरील वर्दळ सुरळीत राहिली.

गुरूवार, १ एप्रिल २०२१ रोजी पहाटे साडेपाच वाजण्याच्या दरम्यान मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६वर धामणदेवी गावालगत मुंबई ते चिपळूण असा कंटेनर (क्र.एमएच ४६ बीएफ २८१३) वरील चालक मोहम्मद अहमद सिद्दिकी (वय २६, रा. इलाहाबाद, जमालपुर कराली कौसाबी राज्य उत्तर प्रदेश) सध्या राहणार न्हावाशेवा उरण हा चालवित घेऊन येत होता. त्याच्या पुढे असलेली कार कंटेनरला ओव्हरटेक करीत असता कंटेनर चालकाने त्याच्या ताब्यातील कंटेनर हा रोडचे डाव्या बाजूला नेल्याने महामार्गावर पलटी झाला.



अपघातामध्ये वाहनांचे नुकसान झाले असून चालकाच्या उजव्या पायाला मुका मार लागला आहे. या कंटेनरच्या क्लीनरलादेखील डाव्या हा-ताला खरचटले असल्याने. यामुळे मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर वाहतुकीची कोंडी ऐन शिमगोत्सवात परतीच्या प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांना सहन करावी लागण्याची शक्यता लक्षात घेऊन सहायक पोलीस उपनिरिक्षक यशवंत बोडकर यांनी वाहतूक पोलीसांच्या मदतीने तातडीने एकेरी वाहतूक चालू केली. अपघातग्रस्त कंटेनर महामार्गावरून क्रेनच्या सहाय्याने काढून उभा करण्याची तरतूद कशेडी टॅप वाहतूक पोलीसांनी केली आहे.

# खालापुरात महिलेचा संशयास्पद मृत्यु ; नातेवाईकांचा आरोप

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खालापूर तालुक्यात आदिवासी बांधवाना पोटची खळगी भरण्यासाठी घरदार सोडून वीटभट्टी वर वीटबिगर म्हणून काम करीत असतात यादरम्यान घरचे कार्य ही लक्षात राहत नाही अशी अवस्था आदिवासी समाजाची आहे असाच प्रसंग खा-लापुरात घडला असून एका वीट बिगाराची पत्नी घरी लग्न कार्य असल्याने पती ला आपल्या ओळखीच्या रिक्षा वल्यासमवेत सकाळी घरातून गेली असता नवऱ्याला न भेटताच वितभट्टीच्या काही अंतरावर बेशुद्ध अवस्थे पती ला महिला आढळून आल्याने तात्काळ दवाखान्यात दाखल केली असता मयत असल्याचे घोषित केले मात्र हा मत्यु संशयास्पद असलाचा आरोप नातेवाईकांनी केला आहे त्यामुळे रिक्षा चालकाची चौकशी करून गुन्ह्याचा तपास करावा अशी मागणी आदिवासी बांधव व कुटुंबाने केली आहे या घटनेतील फरार रिक्षा चालकाला ताब्यात घेण्यात आले आहे

याबाबत सविस्तर वृत्त असे की खालापूर तालुक्यातील राणसई हेमडी आदिवासी वाडी येथील महादेव ..../२

# सभागृहनेते परेश ठाकूर यांच्याकडून पाहणी व सूचना

### वीज रोहित्र संदर्भात योग्य उपाययोजना करण्याची सूचना



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महापालिका हद्दीमधील पोदी येथील लक्ष्मी विष्णू सोसायटी सेक्टर १६ सोसायटीच्या आ-वारात एमएसईबीचे वीज रोहित्र (डीपी) आहे. त्यामुळे या ठिकाणी राहणाऱ्या नागरीकांना पावसाळ्यात विजेचा झटका लागण्याची शक्यता असल्याने या संदर्भात नागरिकांच्या अनेक तक्रारी होत्या. त्या पार्श्वभुमीवर महापलिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी आज (गुरुवार, दि. ०१) एमएससीबीच्या अधिकाऱ्यांसह पाहणी करुन याबाबत लवकरात लवकर योग्य त्या उपाययोजना करण्यासंदर्भातील सूचना दिल्या.

पोदी येथील लक्ष्मी विष्णू सोसायटीमध्ये असलेल्या एमएसईबी डीपीमुळे ..../२

# रात्रीच्या गर्भातला उष:काल

आज सुरू होत असणारे नवे आर्थिक वर्ष ही भारतासाठी एक नवी सुरुवात आहे. हे नवे वर्षही करोनाच्या दुसऱ्या लाटेच्या प्रभावाखाली सुरू होत असले तरी, मागच्या वर्षाचा विकासाचा नीचांक मागे ठेवून भारतीय अर्थव्यवस्था एक नवी झेप घेईल, असे जागतिक बँकेने अगदी ताज्या अंदाजात म्हटले आहे. भारतीय अर्थव्यवस्था १०.१ टक्के वेगाने यंदा वाढेल, असे जागतिक बँकेला वाटते आहे. उणे विकासाची दरी ओलांडून होणारा हा विकास आहे आणि त्यामुळे प्रत्यक्ष व खरा विकासदर कमीच असेल, असे अनेक अर्थतज्ज्ञ म्हणत असले तरी त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे हेच योग्य. याच कारण, युरोप, अमेरिका, जपान किंवा इतरही अनेक देश इतकी तरी झेप घेऊ शकतील का, याची शंका 'वर्ल्ड बँके'ला वाटते आहे. याउलट, टाळेबंदीचा काळ संपल्यानंतर भारतीय उद्योग, व्यवसाय आणि कारखान्यांनी ज्या जोमाने नवा प्रवास सुरू केला आहे; तो जगातल्या सगळ्या वित्तसंस्थांनाच नव्हे तर आपल्या रिझर्व्ह बँकेला काहीसा सुखद धक्कादायक वाटला होता. एकूण राष्ट्रीय उत्पादन म्हणजे जीडीपीत साडेसात ते साडेबारा टक्के वाढ होईल, असे 'वर्ल्ड बँके'ने नमूद केले आहे. साडेबारा टक्के हा अंदाज घसरून दहा टक्के झाला तरी ते मोठे यश असेल. गेल्या काही दिवसांत मूडीज, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, केअर रेटिंग्ज, एस अँड पी या सर्वच यंत्रणांनी भारताच्या विकासाचा वेग दहा टक्क्यांच्या वरच राहील, असे म्हटले आहे. यात आता जागतिक बँकेची भर पडली आहे. अर्थात, सर्वसामान्य नागरिकांना या साऱ्या आकड्यांचा अनुभव आपल्या रोजच्या जीवनात यावा लागतो. सध्या संभाव्य टाळेबंदीला महाराष्ट्रात जो सार्वत्रिक विरोध होतो आहे, त्याचे एक कारण हेच आहे. म्हणजे, सामान्य नागरिक, दुकानदार, कष्टकरी, छोटे उद्योजक आणि कारखानदार हे सध्याच्या प्रतिकूल परिस्थितीत कष्ट करून अर्थव्यवस्थेला संकटातून बाहेर काढण्यास उत्सुक आहेत. ती संधी त्यांना दिली गेली पाहिजे. गेल्या आर्थिक वर्षात कृषी क्षेत्राने जो हात दिला आहे; ती प्रक्रिया पुढे न्यायची असेल तर आता उद्योगांना बंधनमुक्त करावेच लागेल. जागतिक बँकेने आपला अहवाल देताना 'भारताच्या लस-मोहिमेकडे लक्ष ठेवावे लागेल' असे म्हटले आहे. लसीकरण वेगाने झाले तर अर्थव्यवस्थेवरचे मळभ त्याच वेगाने दूर होईल, असा त्याचा अर्थ आहे. तो सरकारी यंत्रणांनी लक्षात ठेवणे, आवश्यक आहे. वेगाने लसीकरण, पुरेशी काळजी आणि उद्योग-धंद्यांना जास्तीत जास्त प्रोत्साहन अशी त्रिसूत्री स्वीकारली तर ट्रॅक्टर किंवा कारविक्रीच्या वाढत्या आकड्यांमधून दिसणाऱ्या पाऊलखुणा अधिकाधिक स्पष्ट होत जातील. मोठा रोजगार देणारे बांधकाम क्षेत्र आता हळूहळू हलू लागले आहे. या पाठोपाठ लसीकरणाचा वेग वाढला तर कित्येक कोटी रोजगार देणारे पर्यटन क्षेत्रही मोकळे होईल. मग अर्थकारणाच्या फिरत्या चाकांचा वेग वाढेल. गेल्या वर्षी शिकलेले अनेक धडे लक्षात ठेवायचे आहेत. केंद्राने करोना काळासाठी आजवर वीस लाख कोटींची विविध पॅकेजेस दिली. त्यामुळेच, केंद्र सरकार या वर्षात अनेक सरकारी उद्योग विकण्याच्या मागे आहे. ते योग्यच आहे. याशिवाय, यंदा मोठा आपत्ती निधी उभारावा लागणार आहे. तसेच, आरोग्य व्यवस्था बळकट कराव्या लागतील. यंदा जगातला पैसा भांडवली गुंतवणुकीच्या रूपाने सर्वाधिक कुठे जाईल, या प्रश्नाचे उत्तरही भारतासाठी समाधानकारक आहे. अनेक पाहण्यांमध्ये भारताचा क्रमांक पहिला किंवा दुसरा आहे. ही नवी परकीय गुंतवणूक नक्कीच काही प्रमाणात नवे रोजगार निर्माण करील. शिवाय, वाढत्या खेळत्या पैशाचे इतरही बरेच आनुषंगिक लाभ असतात. आज जगभरातील सरकारांनी करोनामुळे प्रचंड पैसा अर्थकारणात ओतला आहे. याचा एक परिणाम म्हणून भारतीय भांडवली बाजारात काल संपलेल्या वर्षात २.७५ लाख कोटी रुपये नव्याने आले असतील, असा अंदाज आहे. हा गेल्या दोन दशकांमधला विक्रम आहे. हा सगळा पैसाही अर्थकारणाला नव्या वर्षात नक्कीच वेग देईल. आजपासून सात सरकारी बँकांचे अस्तित्वही संपते आहे. त्या इतर बँकांमध्ये विलीन होत आहेत. आजच वेतनरचनेतील विविध प्रकारचे भत्ते कमी करून 'मूळ वेतन' किमान पन्नास टक्के करण्याचा नियम अमलात येणार होता. त्यामुळे भविष्य निर्वाह निधी वाढला असता. पण हा नियम लांबणीवर पडलेला दिसतो. भारताने नुकतेच परकीय गंगाजळीत रशियाला मागे टाकून जगात चीन, जपान, स्वित्झर्लंड यांच्या मागोमाग चौथे स्थान मिळवले. आपली गंगाजळी आता ५८३ अब्ज डॉलर इतकी प्रचंड झाली आहे. मात्र, या साऱ्या अवाढव्य रकमांचे लाभ सामान्य माणसांना मिळाले नाहीत तर ते त्यांना मृगजळ वाटेल. तरीही, एक दीर्घरात्र संपली आहे. नवा उष:काल होतो आहे. हे नवे आर्थिक वर्ष मध्यमवर्ग आणि वंचितांना वाढती वणवण करायला लावणार नाही, अशी आजतरी आशा आहे.

# श्रीवर्धनमधील श्री सोमजाई देवस्थान ट्रस्टला रु.२ कोटी ६८ लक्ष निधी वितरणास शासनाची मंजूरी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

नगरपरिषद क्षेत्रातील यात्रास्थळांच्या विकास कार्यक्रमासाठी सहायक अनुदान योजनेंतर्गत राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या प्रयत्नातून श्रीवर्धन नगरपरिषदेला श्री सोमजाई देवस्थान ट्रस्ट या तीर्थक्षेत्राच्या विकासाकरिता एकूण रक्कम रुपये २ कोटी ६८ लक्ष इतका निधी वितरीत करण्यास शासनाने मंजूरी आहे. यामध्ये राज्यशासन, नगर परिषद व देवस्थान असे मिळून मंजूर प्रकल्पाची एकूण रक्कम रुपये ६ कोटी २४ लाख इतकी निश्चित करण्यात आली आहे.

राज्यशासनाच्या हिस्स्यातील रु.४ कोटी १८ लक्ष रकमेपैकी रुपये २ कोटी ६८ लक्ष निधी वितरीत करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. मंजूर प्रकल्पाच्या एकूण रुपये ६ कोटी २४ लाख इतक्या रक्कमेपैकी श्रीवर्धन नगर परिषदेचा हिस्सा रु.१ कोटी ०३ लक्ष असून श्री सोमजाई देवस्थान ट्रस्टचा हिस्सा रु.१ कोटी ०३ लक्ष असणार आहे. राज्यातील अनेक तीर्थक्षेत्रांच्या/यात्रास्थळांच्या ठिकाणी भेट देणाऱ्या यात्रेकरूंची संख्या फार मोठ्या प्रमाणात असते. बऱ्याच तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वर्षामधील काही ठराविक कालावधीमध्ये मोठ्या संख्येने यात्रेकरू भेट देतात. अशी तीर्थक्षेत्रे/यात्रास्थळे ज्या स्थानिक नागरी संस्थांच्या क्षेत्रात आहेत त्यांना अशा मोठ्या संख्येने येणाऱ्या यात्रेकरूंना पुरेशा प्रमाणात नागरी मुलभूत सोई-सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने शासनाकडून सहायक अनुदान देण्यात येते.

या प्रकल्पांतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना मंजूर रकमेच्या मर्यादेत सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी करून घ्यावी तसेच या प्रकल्पांतर्गतच्या कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था राहील, असेही शासनाने सूचित केले आहे. या प्राप्त निधीतून श्रीवर्धन नगरपरिषदेच्या हद्दीतील श्री सोमजाई देवस्थान ट्रस्ट या तीर्थक्षेत्राच्या विकासास चालना मिळेल तसेच श्रीवर्धन सारख्या निसर्गरम्य पर्यटनस्थळास भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्याही निश्चितच वाढेल, असा विश्वास राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु.आदिती सुनिल तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

# शिवमर्दानी व मल्लखांब प्रात्यक्षिकांनी तळेकरांचे लक्ष वेधले

**दै.रायगड नगरी । किशोर पितळे**

**तळा** : तळा शिवसेनेच्या वतीने तिथी प्रमाणे शिवजयंती काल साजरी करण्यात आली. यानिमित्ताने श्री सत्यनारायणाची महापूजा, सौ.वश्री लिलाधर खातू संपत्नीक यांच्या हस्ते करण्यात आली. तसेच गरीब गरजूंना, अपंगव्यक्तींना जिवनावश्यक वस्तूचे वाटप शिवसैनिक डॉ.मनोज पाथरे उपनगराध्यक्षा सायली खातू, तालुका प्रमुख प्रद्युम्न ठसाळ, शहरप्रमुख राकेश वडके यांच्या हस्ते शाखा कार्यालयात करण्यात आले. व सायंकाळी ६वा. शिवमर्दानी आखाडा, मल्लखांब साळाव रेवदंडा याची चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी तळे वासीयांच्या डोळ्याचे पारणे फिटले हे शिवजयंती उत्सवाचे खास आकर्षण ठरले.तसेच बालशिवाजी कु.स्वराज्य नांदगावकर यांनी साकारून उपस्थितांचे लक्ष वेधले.



यावेळी महाड -पोलादपूरचे आमदार भरतशेठ गोगावले, जिल्हा प्रमुख अनिल नवगणे, प्रमोद घोसाळकर, तालुका प्रमुख प्रद्युम्न ठसाळ, शहरप्रमुख राकेश वडके, जेष्ठ कार्यकर्ते वसंतशेठ लोखंडे आदी मान्यवरउपस्थित होते. कोरोना महामारीचे संकट असल्याने मा.मुख्यमंत्री.उध्दवजी ठाकरे यांनी दिलेल्या आदेशाचे पालन साध्या पध्दतीने साजरी करून शासकीय नियमांचे काटेकोर पालन करीत साजरी करण्यात आली. शिवजयंती साजरी करण्यासाठी सर्व शिवसैनिक, कार्यकर्ते, नगरसेवक सेविका यांच्या सहकार्याने साजरी झाली.

# मुरुडच्या समुद्र किनाऱ्यावर भटक्या कुत्र्यांची दहशत

**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई** : मुरुडच्या समुद्र किना-यावर गेल्या अनेक दिवसांपासून विशेष करून सकाळच्या वेळेत भटक्या कुत्र्यांची दहशत असून पर्यटक व नागरिकांची डोकेदुखी ठरत असून याकडे शासनाच्या संबंधित तसेच नगरपरिषदेच्या असलेल्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त होत असून योग्य ती उपाययोजना करण्यात यावी. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा नागरिक विनोद नरवणकर यांनी केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून मुरुड समुद्र किनारी सकाळच्या वेळेत भटके कुत्रे टोळक्याने फिरताना दिसतात.त्यामुळे सकाळच्या वेळेत समुद्र किनारी फिरायला (मॉर्निंग वॉकला)जाणा-या नागरिकांची व पर्यटकांची डोकेदुखी ठरत आहे. यापुर्वी देखील मुरुड मध्ये श्वानदंशाच्या अनेक घटना घडल्या आहेत. समुद्रकिनारी भटक्या कुत्र्यांची दहशत निर्माण झाली असून वेळप्रसंगी कोणत्याही क्षणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

# तळा शहरात विना मास्क फिरणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा शहरात विनामास्क फिरणाऱ्या नागरिकांवर प्रशासनातर्फे दंडात्मक कारवाई करण्यात आली.दिवसभरात विनामास्क फिरणाऱ्या नागरिकांकडून ७५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. राज्यात कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता प्रशासनाने निर्बंध अधिक कडक केले आहेत.

राज्यात सर्वत्र मास्कसक्ती करण्यात आलेली आहे. मात्र अद्यापही नागरिकांनी कोरोनाला गांभीर्याने घेतलेले दिसत नाही.प्रशासनाने वारंवार आवाहन करून देखील तळा शहरात नागरिक बिनधास्तपणे विनामास्क फिरताना पाहायला मिळत आहेत.ही बाब लक्षात आल्याने नगरपंचायत कर्मचारी आणि पोलीस प्रशासन यांनी संयुक्तपणे विनामास्क फिरणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई केली. याआधी तळा पोलीस निरीक्षक एस गेंगजे यांनी स्वतःबाजारपेठेत माईकद्वारे सूचना करूननागरिकांना मास्क वापरण्याचे आवाहन केले होते. मात्र तद्नंतरही काही नागरिक हे विनामास्क फिरताना आढळत असल्यामुळे तळा पोलीस ठाण्याचे पी.एस.आय शिवराज खराडे यांनी स्वतः रस्त्यावरउतरूनविनामास्क फिरणाऱ्या नागरिक, व्यापारी व दुचाकी, चार चाकी वाहनांवर दंडात्मक कारवाई केली.

तसेच नागरिकांना आवाहन केले की सार्वजनिक ठिकाणी नागरिकांनी मास्कचा वापर करावा, सामाजिक अंतराचे पालन करावे व प्रशासनाने दिलेल्या निर्देशांचे पालन करून आपला विभाग कोरोना संसर्गापासून दूर ठेवावा. ही कारवाई शहरातील बळीचा नाका, बसस्थानक परिसर, नगरपंचायत रस्ता तसेच आसपास हॉटेल रस्ता आदी ठिकाणी करून विनामास्क फिरणाऱ्यानागरिकांकडून ७५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. या प्रसंगी पीएसआय. शिवराज खराडे, सतिश जगदने, प्रियांका वंजारी, आखाडे, गणेश जगताप, नगरपंचायतीचे धनेश केतकर, आरोग्य विभागाचे मोहित मोरे आदी उपस्थित होते.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# लॉकडाऊनच्या भितीपोटी बिअर शॉपीसह दारु विक्री दुकानांवर तळीरामांची गर्दी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यात कोरोनाचा उद्रेक पाहता राज्य शासनाने पनवेल परिसरात जमावबंदी जाहिर केली आहे. मात्र, पनवेल परिसरातील अनेक बिअर शॉपीसह दारु विक्री दुकानावर तळीरामांची गर्दी दिसून येत असल्याने या ठिकाणी जमावबंदीचे सर्रासपणे उल्लंघन केल्याचे पहावयास मिळत आहे.

महाराष्ट्रातील कोरोना संक्रमाणाचे वाढते संकट पाहता २८ मार्च पासून रात्री कलम १४४ लागू करण्यात आले आहे. सदरची जमावबंदी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या आदेशान्वये राबविली जात आहे. यात सर्व मॉल्स, गार्डन, चौपाटी, थिएटर, हॉटेल, रेस्टॉरंटस् रात्री आठ ते सकाळी सात या वेळेत बंद राहतील. तसेच पाच पेक्षा अधिक नागरिकांना एकत्र जमता येणार नाही. मात्र, शासनाच्या जमावबंदी आदेशाला दारु विक्री दुकानदारांकडून हरताळ फासले गेल्याचे चित्र पनवेल परिसरात पहावयास मिळते.

कोरोनाचे नियम आणि शासनाने घातलेल्या जमावबंदी आदेशाचे भान हरपून तळीरामांची दारु खरेदीसाठी दुकानांसमोर एकच गर्दी होते. परिणामी, जमावबंदी आदेशाचे सर्रासपणे उल्लंघन होताना शहरात जागोजागी दिसते. या गर्दी कडे संबंधित पोलीस ठाण्यांचे दुर्लक्ष का होते? असा सवाल देखील नागरिकांनी उपस्थित केला आहे.

## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस नोटीसीच्या माध्यमातून कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या इमारतीचे विद्यमान मालकांकडून खरेदीखत करण्याचे ठरविलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**गाव : दुंदरे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड नवीन सर्व्हे नं.३९/६, जुना सर्व्हे नं.५७/६ सदर जमिनीबाबत क्षेत्र १९.२० व पोट खराबा २.५० असे एकूण क्षेत्र २१.७०**

सदरची मिळकत ही वरील मालकाची व मालकी हक्काच्या प्रत्यक्ष ताबे कब्जात वहिवाटीतील असून सदरची जमीन मिळकत ही खरेदीखतामार्फत घेण्याचे ठरविले आहे.

तरी वर वर्णन केलेली मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार ताबा, कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षिसपत्र, चार्ज, लीज, अॅटॅचमेंट, लीन, कोर्ट मॅटर वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार खाली दिलेल्या पत्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा हितसंबंध हक्क नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा ''खरेदीखत'' करतील व त्यानंतर आलेल्या हरकती, तक्रार, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच सदरच्या मिळकतीच्या संदर्भातील हक्क हितसंबंध सोडून दिले आहेत असे गृहीत धरुन सदर मिळकतीची ''खरेदीखत'' केले जाईल याची तत्सम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०१/०४/२०२१

**सही/-**
**अॅड.आशिष पनवेलकर**
**ऑफिस पत्ता : प्लॉट नं.१६२, कुंभारवाडा, एम.जी.रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

---

श्री.भाकरे सो.कोर्ट

प्रो.जमा.५०/-

अर्जदारातर्फे वकील
अॅड.प्रवीण दत्तू पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.४९५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२१/०६/२०२१

कै.फसुबाई बाळाराम जळे मयत तर्फे वारस
१) श्री.नागेश बाळाराम जळे
वय : वर्षे, धंदा : व्यापार
२) श्री.योगेश बाळाराम जळे
वय : वर्षे, धंदा : व्यापार
३) श्री.बाळाराम रामचंद्र जळे
वय : वर्षे, धंदा : शेती
वरील तिघेही रा.मु.कळंबोली,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
४) सौ.उषा चंद्रकांत पाटील
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.खारघर गाव, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.उर्मिला रोशन शेळके
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.डेरवली गाव, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की, कै.फसुबाई बाळाराम जळे यांचे निधन दि.३०/०९/२०१६ रोजी सुरज हॉस्पिटल सानपाडा, नवी मुंबई, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ येथे झाले.

कै.फसुबाई बाळाराम जळे यांचे मालकी हक्कात आणि ताबे कब्जात पुढील वर्णन केलेली मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे : कळंबोली, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील ग्रामपंचायत कळंबोली हद्दीमधील घर नंबर २८३, क्षेत्र ४३७, आकारणी कर ५९१ ही घर मिळकत आहे.**

मयत कै.फसुबाई बाळाराम जळे यांच्या पश्चात अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मे.न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करतील व मयत कै.फसुबाई बाळाराम जळे यांचे वारसपत्रात अर्जदार हक्कदार आहेत असे शाबीत झाल्यास त्यांना वारसदाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दि.१/०४/२०२१ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- | | सही/- |
|---|---|---|
| क.लिपीक | कोर्टाचा शिक्का | सहा.अधिक्षक |
| दि.न्या.व.स्तर, पनवेल | | दि.न्या.व.स्तर, पनवेल |

## आरोपीस पनवेल गुन्हे शाखेकडून अटक

गुन्हे विजय चव्हाण यांनी सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्याबाबत गुन्हे शाखेस आदेशित केले होते. सदर गुन्ह्यातील आरोपी प्रथमेश योगेश धुमाळ वय २३ वर्ष रा. रूम नंबर ०१ चिंतामण को-ऑ. हाऊसिंग सोसा. सेक्टर २० नेरूळ हा सदरचा गुन्हा घडल्यापासून मागील दोन महिने पोलिसांना गुंगारा देत फरार होता. त्याचा ठाव ठिकाण्या बाबत गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल चे अधिकारी व कर्मचारी वेळोवेळी पाठ पुरावा करीत असताना सदर आरोपी बाबत गुन्हे शाखा कक्ष २ चे पो. उपनि.वैभव रोंगे यांना मिळालेल्या बातमी वरून गुन्हे शाखा कक्ष २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे यांच्या नेतृत्वाखाली पो उप निरी वैभव रोंगे, पो. ना. सचिन म्हात्रे, रुपेश पाटील, दीपक डोंगरे यांनी गुन्ह्यातील आरोपी प्रथमेश योगेश धुमाळ यास खांदेश्वर रेल्वे स्टेशन रिक्षा स्टॉप परिसरातून ताब्यात घेतले . सदर आरोपींने गुन्ह्याची कबुली दिली असल्याने त्यास पुढील कारवाई कामी नेरूळ पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सदस्यांच्या उपस्थितीत सभागृहात घेण्याची मागणी

समितीमधील सदस्य असलेल्या नगरसेवकांनी स्थगित करायला लावली. मालमत्ता कराबाबत आघाडीच्या नगरसेवकांचा विरोध व आघाडीला सर्वसामान्य जनतेचा मिळत असलेला पाठींबा लक्षात घेता सत्ताधारी नगरसेवकांनी दि.१७ जानेवारी २०१९ रोजी ठराव क्र.११८ अन्वय पारित केलेला ठराव हा चुकीचा आहे. असे मान्य केला असून आपण पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा सूचना क्र.११ दि.०५ एप्रिल २०२१ रोजी आमच्या मागणीप्रमाणे आयोजित केलेली आहे. ही सभा शासन निर्णयाप्रमाणे व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून घेण्याचे ठरविले आहे. तरी मालमत्ता कर हा अति महत्वाचा जनतेच्या जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे आपण सर्व नगरसेवकांनी मिळून एकत्रित निर्णय घेऊन सोशल डिस्टंसिंग नियम पाळून सभा सभागृहातच घ्यावी. तसेच वरील सभेत पत्रकारांना आमंत्रित करावे. या आधी कोवीडमध्ये झालेल्या प्रत्येक सभेला सन्माननीय पत्रकार हजर असायचे तरी ज्या प्रमाणे लोकसभा, विधानसभा यामध्ये विविध अधिवेशन होतात. त्यासाठी सर्व सन्मानीय सभासद हजर असतात त्यामुळे आपण देखील हि विशेष सभा सत्ताधारी व विरोधक सन्मानीय सदस्यांना विचारात घेऊन जनतेचा जिव्हाळ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी हि सभा फिजिकल घ्यावी, असे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांचे म्हणणे आहे. तसे निवेदन देण्यात आले आहे.

## क्रीडा विभागाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान

हार्वेस्टिग व बोअरवेल, फिल्टरेशन प्लँट, जलतरण व डायव्हींग तलाव, मटेरियल टेस्टींग न्ड रॉयल्टी चॉर्ज, जीएसटी, विद्युतीकरण, पाणी व्यवस्था, क्रीडांगण समपातळीकरण व इतर सुविधायुक्त बाबींचा यामध्ये समावेश आहे.

कोकण विभागात मुंबई ते सिंधुदूर्ग या परिसरातील अनेक खेळाडूंना रायगड जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या या क्रीडा संकुलामुळे विविध खेळांमध्ये प्राविण्य मिळविण्यास नक्कीच सहाय्य होईल, असा विश्वास राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु.आदिती सुनिल तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

## खालापुरात महिलेचा संशयास्पद मृत्यु

कातकरी हे आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी चौक गावाजवळ नदोडे येथील यशवंत शिंदे यांच्या वीटभट्टी वर कुटूंब सोडून काम करीत होते मात्र चार दिवसावर घरात नातेवाईकांचे लग्न असल्याने आपल्या नवऱ्याला आणण्यासाठी ओळखीचा रिक्षा वाला रविराज उर्फ गुड्डू गुप्ता यांच्या रिक्षातून सकाळी घरातून ९ वाजता गेली. मात्र दुपार पर्यत नवऱ्याकडे पोहचलीच नाही नडोदे येथील वीटभट्टी च्या काही अंतरावर असताना रिक्षा वाला गुड्डू हा जाऊन महादेव यांना सांगितले की तुमची पत्नी घ्यायला आली आहे ती समोरच्या ब्रिज जवळ आहे असे सांगितल्याने महादेव हे त्या ठिकाणी आल्यानंतर त्यांना आपली पत्नी शुभांगी दगडात पडलेली पाहिले. गुड्डू ने तिला दवाखान्यात घेऊन जाणे गरजेचे आहे असे सांगून रिक्षा वाला गुड्डू ने पळ काढला त्यातनंतर तातत्काळ चौक येथील साई हॉस्पिटलमध्ये मध्ये घेऊन गेले असता शुंभागी मयत असल्याचे जाहीर केले. त्यामुळे घटनास्थळी ज्या अवस्थेत आहे त्या ठिकाणी आढळून आली ते संशयास्पद असल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे त्यामुळे या महिलेच्या मृत्यू बाबत तर्क वितर्क काढले जात आहेत.

## सभागृहनेते परेश ठाकूर यांच्याकडून पाहणी व सूचना

पावसाळ्यामध्ये या सोसायटी मध्ये राहणाऱ्या लागणाऱ्या नागरीकांना विजेचा धक्का लागण्याची शक्यता आहे. त्या बाबत अनेक तक्रारी नागरीकांना केल्या होत्या. याची दखल घेत पनवेल महापालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी या सोसायटीमधील डीपीची एमएसईबीचे अधिकारी नानोटे, सिडको अधिकारी गौरव इंगळे यांच्यासोबत पाहणी करुन यासंदर्भात लवकरात लवकर आणि योग्य उपाययोजना करण्यासंदर्भात त्यांना सूचना केली. या वेळी नगरसेवक तेजस कांडपिळे, अजय बहिरा, नगरसेविका चारुशीला घरत, वृषाली वाघमारे, किशोर मोरे, जयेश ठाकुर, सोसायटी चेअमन दिलिप शिर्के, शैलेश पाटील, गौरव कांडपिले, संतोष साळवे यांच्यासह स्थानिक रहिवासी उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक: **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# प्लाझ्मा बँकची सुविधा सुरू करा : नेत्रा पाटील

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

पनवेल महानगरपालिका हद्दीत पुन्हा दिवसेदिवस कोरोना बाधित रुग्णांची संख्या वाढत चालली आहे. कोरोना संसर्गजन्य आजराच्या पार्श्वभूमीवर सदर आजारात एक चांगली उपचार पद्धती म्हणून प्लाझ्मा थेरपी उपयोगी पडत असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

मागील वर्षी सदर सुविधा पनवेल महनगरपालिकेच्या वतीने एम.जी.एम.हॉस्पिटल, कामोठे येथे उपलब्ध होती त्यामुळे रुग्णांना अथवा त्यांच्या नातेवाईक यांना सदर सुविधा सहज उपलब्ध होत होती. परंतु सध्य स्थितीत सदर सुविधा उपलब्ध नसल्यामुळे रुग्ण व नातेवाईक यांचे हाल होत आहेत. माझ्याकडे देखील ह्या बाबतीत अनेक वेळा नातेवाईकांचे फोन येत असतात.



उपचारा दरम्यान डॉक्टरांकडून ज्यावेळेस प्लाझ्मा (रक्तद्रव) ची मागणी केली जाते त्यावेळेस सदर नातेवाईकांच्या पुढे मोठा प्रश्न निर्माण होतो व त्यांची धावपळ सुरू होते. सदर प्लाझ्मा बँकची सुविधा ही तात्काळ सुरू करण्यात यावी जेणेकरून कोरोना बाधित रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांचे होणारे हाल टळतील व वेळेत त्यांना उपचार मिळतील. सदर बाब अत्यावश्यक सेवा म्हणून पनवेल महानगरपालिका हद्दीत सुरू करण्यास यावी अशी मागणी खारघर मधील भाजपच्या नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी महापालिकेचे आयुक्त सुधाकर देशमुख यांच्याकडे लेखी पत्रानुसार केली आहे.

# चिरनेरच्या जमिनीवर पिकला कलिंगडचा मळा

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

उरण तालुक्यात भातशेती बरोबर काही भागात वालांची शेती तसेच भाजीपाल्याचे उत्पादन मागील कित्येक वर्षांपासून घेतले जात आहे. त्यातीलच चिरनेर येथील शेतकरी गजानन केणी हे कित्येक वर्षे भाजीपाल्याचे पीक नियमित घेत होते.मात्र या शेतकऱ्यांनी भाजीपल्याबरोबर आपल्या शेतातील अवघ्या २५ गुंठे जागेत बेबी या जातीच्या कलिंगडाची लागवड केली आहे.



गजानन केणी यांना कलिंगडाच्या लागवडीला उत्तम प्रतिसाद मिळाला असून २५ गुंठाच्या जागेत दीड टनापेक्षा अधिक कलिंगडाचे उत्पादन मिळविले आहे. त्यासाठी गजानन केणी यांना बियाणे, खत व मजुरीसह १४ हजार रुपये खर्च आला आहे. त्याच प्रमाणे त्याने स्वतः ही मेहेनत करून दीड टनाहून अधिक कलिंगड उत्पादन झाल्याने त्यांना या कलिंगड शेतीतून ४५ हजार रुपये उत्पन्न मिळाले असून, १४ हजार खर्च वगळता तीन महिन्यापूर्वी करण्यात आलेल्या कलिंगडाच्या लागवडीतून ३१ हजार रूपयांचा निव्वळ नफा मिळाला आहे तसेच वांगी आणि मिरची मधून ही चांगल्या प्रकारे नफा मिळत आहे.

या परिसरात चिरनेर आणि कलंबूसरे बाजुनी डोंगराळ भाग असल्याने डोंगराच्या पाण्याच्या निचऱ्यामुळे शेतीचा मातीला अधिक प्रमाणात ओलावा राहातो. त्यामुळे कलिंगडाच्या पिकाला ही जमीन पोषक ठरत असल्याने कलिंगडाचे उत्पादन चांगल्या प्रकारे होऊ शकते, याचे उत्तम उदाहरण चिरनेरचे शेतकरी गजानन केणी यांनी संपूर्ण उरण तालुक्याला दाखवून दिले आहे. सदर कलिंगड गोड आणि चवदार असल्याने पनवेल व उरण येथील किरकोळ बाजारपेठेत हा कलिंगड विक्रीसाठी पाठविला जात आहे तसेच स्वतः ही कलिंगडाची विक्री चिरनेर च्या नाक्यावर केली जात आहे.

उरण तालुक्यात कित्येक वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने दुधी, कारली, पडवळ, शिराळी, घोसाळी, काकडी, वांगी, टोमॅटो आदी भाजीपाल्याचे उत्पादन घेतले जात आहे. परंतु कलिंगडाचे पिक आजपर्यंत कोणीही घेण्याचा प्रयत्न केला नाही. उरण तालुक्यातील चिरनेर येथील शेतकरी गजानन केणी यांनी सर्व प्रथम कलिंगडाची लागवड करून त्याची योग्यतेने जोपासना करून कलिंगडाचे सुयोग्य असे उत्पादन घेण्यात यशस्वी झाले आहेत. त्यामुळे भाताचे कोठार असलेल्या उरण तालुक्यातील तरुणांनी केवळ नोकरीवर अवलंबून न राहता कलिंगड, ऊस अशा उत्पादनाकडे लक्ष केंद्रित करावे असे आवाहन उरणचे सहाय्यक कृषी अधिकारी उमेश गाताडी यांनी केले आहे.

# मुठवली खु.येथे शिवजयंती सोहळा साध्या पद्धतीने साजरा

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

जय भवानी मुठवली खु.येथे शिवगर्जना मित्र मंडळ मुठवली युवक मंडळाचे वतीने संपन्न करण्यात आलेली शिवजयंती उत्सव कोरोना महामारीचे पार्श्वभूमीवर कोणताही गाजावाजा न करता केवल ग्रामस्थ व महिलांच्या सहयोगाने अतिशय साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला.

यावेळी शिवप्रतिमेचे पूजन,विद्यार्थी भाषणे व शैक्षणिक साहित्य वाटप, जेष्ठ नागरिक सत्कार, हळदीकुंकू समारंभ, आर्यन बेर्डे या बाल व्याख्यात्याचे शिवचरित्रपर व्याख्यान व्याख्यान, पालखी सोहळा, प्रसादी, भजन आदी कार्यक्रम संपन्न करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून धर्मा शेलार, प्रशांत बर्डे, व्याख्यानकार. कु आर्यन प्रशांत बर्डे, कृष्णा फ्लाय हार्डवेअर (रोहा)नरेश गायकर, विठोबा तुपकर, सहादेव शिंदे, सहादेव दिघे, नथुराम तुपकर, शांताराम तुपकर, महेश तुपकर, चंद्रकांत शिंदे, व ग्रामस्थ मंडळ मुठवली उपस्थित होते.

# श्रीवर्धन व माणगाव नगरपंचायत अंतर्गत कामांसाठी रु.५० लक्ष निधी वितरणास शासनाची मंजूरी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी अनुदान वितरीत करण्यास शासनाने मंजूरी दिली असून त्यात जिल्ह्यातील श्रीवर्धन व माणगाव येथील प्रस्तावित कामांचा समावेश आहे.

राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांच्याकडे राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या कामांना मंजूरी देऊन निधी उपलब्ध करणेबाबत मागणी केली होती. त्यानुसार जिल्ह्यातील श्रीवर्धन येथील नगरपंचायत अंतर्गत नूर मस्जिद कब्रस्तान संरक्षक भिंत बांधणे व माणगाव येथील नगरपंचायत अंतर्गत मोहल्ला कब्रस्तान संरक्षक भिंत बांधणे, या कामांसाठी शासनाकडून प्रत्येकी रू. २५ लक्ष असे एकूण ५० लक्ष इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाने सन २००८-०९ पासून राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम कार्यान्वित केला आहे. या योजनेंतर्गत खासदार, आमदार व जिल्हाधिकारी यांच्याकडून महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत यांच्या प्राप्त प्रस्तावांना मंजूर देवून निधी वितरीत करण्यात येतो. या अंतर्गत खासदार, आमदार व जिल्हाधिकारी यांच्या प्रस्तावांना महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपंचायत क्षेत्रात कामांच्या संख्येची मर्यादा एकापेक्षा जास्त परंतु प्रति काम प्रति वर्षी महानगरपालिकेस कमाल रु.४० लक्ष, अ वर्ग नगरपालिकेस कमाल रु.३० लक्ष, ब वर्ग नगरपालिकेस व क वर्ग नगरपंचायतीस कमाल रु.२० लक्ष रुपये निधी देण्याची तरतूद आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही श्री.सुनील देहू पारेठा वगैरे ८ रा.पालेखुर्द, ता.पनवेल, जि.रायगड यांचे नांवे महसूल दप्तरी आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पालेखुर्द, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री.सुनील देहू पारेठा वगैरे ८ | ३०/५ | ०-१४-२० पो.ख.०-०२-६० | २.९४ |

मौजे : पालेखुर्द, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक श्री.सुनील देहू पारेठा वगैरे ८ रा.पालेखुर्द, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडून आमचे अशिल श्री.हरिश्चंद्र महादू पाटील वगैरे इतर मो. नं.९३२०२१४२१४ यांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेली कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दि.०२/०४/२०२१**

**सही/-**
**मयुरेश प्र.हनुमंते**
**ॲडव्होकेट-हायकोर्ट**
**शॉप नं.९, पवन अपार्टमेंट, नवीन कोर्टाचे जवळ, लोखंडीपाडा, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

मा.पांडे साहेब कोर्ट

अर्जदार तर्फे वकील
ॲड.निलम मुंगाजी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.नं.४४४/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०४/०५/२०२१

श्री.परशुराम सॅमसॅन पंदुकोनी
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.३०३, प्लॉट नं.२१/बी,
सेक्टर ८, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत वहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दि.२२/०१/२०२० रोजी मु.मिडलाईफ हॉस्पिटल उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेला आहे. म्हणून अर्जदार यांनी त्यांच्या मुलाच्या कु.दक्ष परशुराम पंदुकोनी यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होणे करिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कु.दक्ष परशुराम पंदुकोनी यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झाला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर जाहीर नाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटी आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१/४/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

मा.भाकरे साहेब यांचे कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.निलम लक्ष्मण पाटील-मुंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.५०६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०६/२०२१

१) श्रीमती.सुवर्णा बाबुराव देशमुख
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.राजेश बाबुराव देशमुख
वय : ४३ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.संतोष बाबुराव देशमुख
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
अर्जदार क्र.१ ते ३ सर्व रा.मु.पो.गव्हाण,
ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.अर्चना संजय पासलकर
वय : ३६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.यशोदिप सोसायटी, संघर्ष चौकाजवळ,
वार्जे मालवाडी, पुणे शहर, ता.जि.पुणे-४११०५८ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार क्र.१ यांचे पती म्हणजेच अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील बाबुराव रामभाऊ देशमुख हे दि.२९/०६/२०२० रोजी मयत झाले आहेत. मयत बाबुराव रामभाऊ देशमुख यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीच्या मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लि. यांनी साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केल्या असून सदर जमीन मिळकतींचे सविस्तर वर्णन पुढीलप्रमाणे :

**अ) संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | गावाचे नाव | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गव्हाण | १५९ | ३३७ | ५ | ०-२२.५ | ३५० |
| | | | ३३७ | १० | ०-१६.३ | |

ब) तसेच मयत बाबुराव रामभाऊ देशमुख यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीची मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे क्र.२७४/५ क्षेत्र ०-७३.० ही मिळकत देखील महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लि. यांनी साडेबावीस टक्के भूखंड योजनेंतर्गत नेरुळ-बेलापूर-सीवूड-उरण रेल्वे प्रकल्पाकरिता संपादीत केली असून सदर जमीन मिळकतींचे संपादनापोटी खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेला भूखंड वाटप केलेला आहे. सदर भूखंडाचे सविस्तर वर्णन पुढीलप्रमाणे :

**भूखंडाचे वर्णन**
**मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**
**सिडको संचिका क्र.उलवे-१५**

| नोड | सेक्टर नंबर | भूखंड क्रमांक | एकूण क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| उलवे | २६ | १३६ | ११५० |

क) तसेच मयत बाबुराव रामभाऊ देशमुख यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीची मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे क्र.३३८/११/अ/१, क्षेत्र ०-२८.०० ही मिळकत देखील आहे.

आता वर नमूद मिळकतींच्या संपादनापोटी मिळणारे भूखंड व इतर लाभ मयत बाबुराव रामभाऊ देशमुख यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून सदर अर्जदार व त्यांचे इतर सहमालक यांस मिळणेकरिता अर्जदारांनी सिडको कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयतांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगितले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत बाबुराव रामभाऊ देशमुख यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०१ माहे एप्रिल सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत इतर हक्कात सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी कुळ म्हणून नाव असलेल्या १) श्रीमती.सिताबाई शंकर मोकल, २) श्री.विलास शंकर मोकल, ३) भाऊ शंकर मोकल, ४) श्री.किशोर शंकर मोकल, ५) श्री.दयानंद शंकर मोकल, ६) सौ.वनिता परशुराम पाटील, ७) सौ.विमल राजेंद्र म्हात्रे, ८) सौ.करुणा निवृत्ती शिवकर, ९) सौ.प्रमिला हासुराम पाटील, १०) सौ.छाया सुरेंद्र म्हात्रे व ११) सौ.सुशिला शंकर मोकल व सदर यांच्याशी चर्चा करून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार आमचे अशिल करणार आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : साई, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | सर्व्हे/गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| साई | २४४ | ३ | ०-३३-७० पो.ख. ०-०२-३० एकूण ०-३६-०० | ४.०० |

तरी वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कोणताही गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, विकसन करारनामा, कुळहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा महसूली वाद असल्यास त्यांच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसात माझे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून खात्री करून घ्यावी. उपरोक्त तीस दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास माझे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.अश्विन मोकल**
**पत्ता : गाळा नं.६, गुरुवाटीका, ठाणा नाका रोड, पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९९३०१८३२४४**

ॲड.जान्हवी वाडकर-गोगटे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्रं ३९९/२०२१
ने.ता.१५/०५/२०२१

प्रल्हाद अंबाजी ढमाले
वय : ३८ वर्षे, धंदा : शेती
रा.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वडघर, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार यांची मुलगी दिक्षा प्रल्हाद ढमाले ही दि.१३/०८/२००८ रोजी मौजे : चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी जन्म झालेला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने सदर जन्माची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेले आहे. सबब कारणे सदरचे अर्जदार यांची मुलगी दिक्षा प्रल्हाद ढमाले हिच्या जन्माची नोंदणी करण्याचे आदेश निर्गमित अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत चिंचपाडा, पनवेल पंचायत समिती, ता.पनवेल, जि.रायगड यांना देण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब सदर फौजदारी चौकशी अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद कलम १९६९ कलम १३ (३) प्रमाणे जन्माची नोंद करून मिळण्याकरिता अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर जन्माच्या नोंदीच्या अर्जाचा आदेश मिळण्याकरिता कोणाच्याही, कसल्याही व कोणत्याही हरकती असल्यास सरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.कोर्टात दाखल कराव्यात, मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांच्या लाभांत जन्माच्या नोंदीचा आदेश दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख ३१/०३/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याने नोटीस दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

मा.श्री.राव साहेब

ॲड.अनिल आर. नागदेवे
ॲड.संजय के. कानडे
ॲड.गौरव संजय कानडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.३६१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०५/२०२१

कै.ज्ञानेश्वर सखाराम लोंढे मयत यांचे वारस
१) श्रीमती.सुमन ज्ञानेश्वर लोंढे
वय : ७६ वर्षे, धंदा : घरकाम
२) श्री.किशोर ज्ञानेश्वर लोंढे
वय : ५४ वर्षे, धंदा : नोकरी
१ व २ पत्ता. माऊली निवास, पोदी नं.२ १/२,
सेक्टर १५, नवीन पनवेल
३) सौ.कल्पना विलास कोल्हे
वय : ५७ वर्षे, धंदा : घरकाम
पत्ता : १२०३, सी विंग ६१६, श्री लक्ष्मी रेसिडेन्सी,
न.म.जोशी मार्ग, भायखळा स्टेशन जवळ,
व्ही.जे.बी.उद्यान मुंबई-४०००२७
४) सौ.वनिता सुरेश नाईक
वय : ५५ वर्षे, धंदा : घरकाम
रा.सागरदिप को.ऑप.हौ.सोसायटी,
फ्लॅट नं.११, दुसरा मजला, गोदरेज हिल रोड,
माधव संसार जवळ, खडकपाडा,
कल्याण, ठाणे-४२१३०१ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. ज्ञानेश्वर सखाराम लोंढे यांचे दि.२५/०८/२०१९ रोजी नवीन पनवेल येथे निधन झालेले असून, त्यांना अर्जदार क्र.१ ते ५ हे कायदेशीर वारस आहेत. कै.ज्ञानेश्वर सखाराम लोंढे यांचे मयत भाऊ कै.तुकाराम सखाराम लोंढे व इतर ६ यांचे नावे असलेली खालील वर्णनाची जमीन भूसंपादीत झालेली आहे.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| पनवेल | ४७७ | २८८ | २ पै | १-०२-४ | १९.३१ |

अर्जदार यांना कै.तुकाराम सखाराम लोंढे यांचे वारस म्हणून १२.५ टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत वर नमूद संपादीत केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात सिडकोकडून मिळणाऱ्या भूखंडामध्ये व इतर मोबदल्यामध्ये मिळकतीमध्ये १/७ (सातवा) हिस्सा आहे. सबब वरील मिळकतीसाठी वारसदाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

तरी अर्जदार यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि जर अर्जदार कै.ज्ञानेश्वर सखाराम लोंढे यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसदाखला मंजूर करेल.

आज दि.३१/०३/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : सजा पिरकोन, ता.उरण, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या जमिनीचे सर्व मालकी हक्क माझे अशिल यांनी जमीन मिळकतीच्या मालकांकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर वर्णन व विद्यमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणे

**वर्णन**
**मौजे : पिरकोन, ता.उरण, जि.रायगड**

| भोगवटादाराचे नाव | सर्व्हे क्रं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकारणी |
|---|---|---|---|---|
| श्री.राजवीर रोहित वोहरा श्री.अशोक ज्ञानचंद वोहरा | १९ | १ | ०-२१-८० | रु.३.३१ पै. |

वरील मिळकत ही एकूण ०.२१.८० गुंठे क्षेत्रापैकी भोगवटादार राजीवर रोहित वोहरा आणि श्री.अशोक ज्ञानचंद वोहरा यांच्या नावे आणि मालकीची असलेली ०.४.५० इतक्या क्षेत्रफळाची जमीन माझे मालकीची असलेली परवानगी मिळवून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही गहाण, दान, बोजा, बक्षिस, साठेकरार, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचे दस्ताने, कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे असे समजण्यात येवून सदरहू मिळकती संदर्भात माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

पनवेल/उरण
दि.०१/०४/२०२१

**सही/-**
**श्री.प्रसाद एन.पाटील**
**ॲडव्होकेट**
**पत्ता : पुरुषोत्तम सदन, पहिला मजला, फ्लॅट नं.३, म.फुले मार्ग, पनवेल**
**मो.नं.९७०२०८२६६९**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : सजा तळबंदखार, ता.उरण, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या जमिनीचे सर्व मालकी हक्क माझे अशिल यांनी जमीन मिळकतीच्या मालकांकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर वर्णन व विद्यमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणे

**वर्णन**
**मौजे : तळबंदखार, ता.उरण, जि.रायगड**

| भोगवटादाराचे नाव | सर्व्हे क्रं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकारणी |
|---|---|---|---|---|
| श्री.अशोक ज्ञानचंद वोहरा श्री.राजवीर रोहित वोहरा | २३ | १ | ०-२५-४० | रु.२.९३ पै. |
| | २३ | २ | ०-२५-४० | रु.२.९३ पै. |
| | २३ | ३ | ०-२६-१० | रु.२.९५ पै. |

वरील मिळकत ही एकूण वर नमूद केलेल्या क्षेत्रापैकी भोगवटादार श्री.अशोक ज्ञानचंद वोहरा, श्री.राजीवर रोहित वोहरा यांच्या नावे आणि मालकीची असलेली सर्व क्षेत्रफळाची जमीन माझे मालकीची असलेली परवानगी मिळवून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही गहाण, दान, बोजा, बक्षिस, साठेकरार, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचे दस्ताने, कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे असे समजण्यात येवून सदरहू मिळकती संदर्भात माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

पनवेल/उरण
दि.०१/०४/२०२१

**सही/-**
**श्री.प्रसाद एन.पाटील**
**ॲडव्होकेट**
**पत्ता : पुरुषोत्तम सदन, पहिला मजला, फ्लॅट नं.३, म.फुले मार्ग, पनवेल**
**मो.नं.९७०२०८२६६९**

# संक्षिप्त...

## पोलीस असल्याची बतावणी करून वृद्ध इसमास लुटले

**दै.रायगड नगरी । संजय कदम**

**पनवेल** : पोलीस असल्याची बतावणी करून दोन अनोळखी इसमांनी एका ६६ वर्षीय वृद्ध इसमास लुटल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली आहे.

तुकाराम जगताप (६६ रा.सेक्टर १७, कामोठे) हे सेक्टर ३६ येथून पायी जात असताना दोन अनोळखी इसम त्यांच्याजवळ आले व त्यांनी आपण पोलीस असल्याचे भासवून या रस्त्यावर खूप चोऱ्या होत आहेत असे त्यांना सांगून तुमच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढून रुमालात बांधून ठेवा असे बोलण्यात गुंतवून त्यांच्या नकळत त्यांच्या अंगावर असलेले सोन्याचे ब्रेसलेट, सोन्याची अंगठ्या असा एकूण जवळपास ४२ हजार रुपये किंमतीचा ऐवज काढून घेवून ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## महावितरण कंपनीच्या रोहित्रामधील ऑईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महावितरण कंपनीच्या रोहित्रामधील ऑईलची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना तालुक्यातील तळोजा येथील देवीचापाडा परिसरात घडली आहे.

शासकीय महावितरण कंपनीचे देवीचापाडा या ठिकाणी रोहित्र असून त्या ठिकाणी असलेल्या जवळपास ५० हजार रुपये किंमतीचे ५०० लीटर केव्हीए मधील ऑईल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## गोवे येथे शिवजयंती मोठया उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील गोवे येथे जय हनुमान मित्र मंडळ गोवे येथे शिवजयंती उत्सव मोठया उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी ९.३० वा रायगड किल्ल्यावरून गोवे येथे भव्य मशाल यात्रेचे आगमन,सा.४.००छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पालखीची मिरवणूक,सा.७.०० शिवकालीन मर्दानी खेळ,आयोजित करण्यात आला. रात्री १०.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांचे भाषण,रात्री ११.०० वा. सिद्धी सतीश पवार यांचे पावनखिंड या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आला.यानंतर बक्षीस वितरण कार्यक्रम अशा विविध प्रकारचा सोशल डिस्टन्सचे नियमाचे पालन करीत सर्व कार्यक्रम मोठया उत्सहात संपन्न झाला. सर्व कार्यक्रम यशस्वीकरण्यासाठी जय हनुमान मित्रमंडळाचे पदाधिकारी सर्व सदस्य यांनी मेहनत घेतली.

# नराधम पित्याने केले होते स्वत:च्या दोन्ही मुलींवर लैंगिक अत्याचार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील उलवे भागात राहणाऱ्या एका नराधम पित्याने आपल्या १३ वर्षांच्या मुलीसोबत अश्लिल चाळे करुन तिचा विनयभंग केल्याचा प्रकार उघडकीस आला असतानाच याच नराधम पित्याने आपल्या दुसऱ्या मुलीवर देखील लैंगिक अत्याचार केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. त्यामुळे एनआरआय पोलिसांनी या नराधम पित्यावर बलात्कार आणि पोक्सो कलमाखाली दुसरा गुन्हा दाखल केला आहे.

उलवे भागात राहणाऱ्या या नराधमाच्या पत्नीचे निधन झाल्याने तो आपल्या तीन मुलींसोबत उलवे भागात राहण्यास होता. मात्र, वयात येत असलेल्या आपल्याच मुलींवर त्याची वाकडी नजर पडली. त्यामुळे त्याने काही महिन्यांपासून आपल्या सर्वात लहान असलेल्या १३ वर्षाच्या मुलीवर वाईट नजर टावून तिच्यासोबत आश्लल चाळे करण्याचा प्रयत्न सुरु केला होता. मात्र, पिडीत मुलीने त्याला विरोध करुन पोलिसांकडे तक्रार करण्याची धमकी दिल्यानंतर या नराधम बापाने सदर मुलीला लाकडी बांबुने जबर मारहाण केली होती. त्यामुळे पिडीत मुलीने घरातून बाहेर पळ काढत नेरुळ रेल्वे स्टेशन गाठले होते. त्यानंतर नेरुळ पोलिसांनी पिडीत मुलीला नेरुळ रेल्वे स्टेशन मधून ताब्यात घेऊन तिच्याकडे विचारपूस केल्यानंतर वडिलांकडून होत असलेल्या अत्याचाराची माहिती तिने दिली होती. त्यानंतर एनआरआय पोलिसांनी पिडीत मुलीच्या नराधम बापावर विनयभंग आणि पोक्सो कलमाखाली गुन्हा दाखल करुन २५ मार्च रोजी त्याला अटक केली आहे. त्यानंतर पोलिसांनी सदर प्रकरणाचा पुढील तपास करण्यासाठी आरोपीच्या दुसऱ्या मुलींकडे विचारपूस केल्यानंतर त्याच्या दुसऱ्या मोठ्या मुलीने देखील तिच्यावर वडिलांनी अनेकवेळा लैंगिक अत्याचार केल्याची माहिती दिली. घाबरुन सदर प्रकाराची माहिती कुणाला दिली नसल्याचे तिने सांगितल्यानंतर एनआरआय पोलिसांनी सदर नराधम पित्यावर बलात्कार आणि पोक्सो कलमाखाली दुसरा गुन्हा दाखल केला आहे.

## पथदिवे बंद असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात ; जिल्ह्यातील ४० टक्के रस्ते अंधारात



**दै.रायगड नगरी । गौसखान पठाण**

**सुधागड/पाली** : सुमारे १४९ कोटींचे थकीत वीज बिल असल्याने महावितरणने जिल्ह्यातील साधारण १०९० ग्रामपंचायतींच्या पथदिव्यांची जोडणी तोडली आहे. त्यामुळे मागील १८ दिवसांपासून जिल्ह्यातील ४० टक्के रस्त्यांवर अंधार आहे. मग अशा वेळी पहाटे व सायंकाळी चालण्यासाठी व व्यायामासाठी जाणाऱ्या नागरिकांचे प्रमाण घटले आहे. परिणामी त्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतांना दिसत आहे.

कोरोनाच्या संकटात अनेक जण आपल्या आरोग्याची काळजी घेत आहेत. तसेच गरोदर महिला, मधुमेह, उच्च रक्तदाब असणाऱ्यांना डॉक्टर चालण्याचा सल्ला देतात. सध्या उन्हाची काहिली वाढत असल्याने अनेक जण पहाटे लवकर व रात्री चालण्यास पसंती देतात मात्र पथदिवे बंद असल्याने त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. असे पालीतील शिक्षक प्रशांत नागोठकर यांनी सांगितले. पथदिवे नसल्याने

नागरिकांना पहाटे मोकळ्या हवेत फिरणे, सायकलिंग करणे व रात्री शतपावली करणे जिकरीचे व जोखमीचे होत आहे. असे सिद्धेश्वर सरपंच उमेश यादव यांनी सांगितले. तर अडुळसे गावचे सरपंच भाऊराव कोकरे म्हणाले की पथदिवे बंद असल्याने ग्रामीण भागातील लोकांची मोठी गैरसोय होत आहे. पहाटे दूध काढणे, गोठा साफ करणे तसेच शेतीचे कामे करतांना अनेक अडचणी येत आहेत. अनेक वृद्ध फिरण्यासाठी देखील बाहेर पडत नाहीत. असे देखील कोकरे यांनी सांगितले.

वंचीत बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष अमित गायकवाड यांनी सांगितले की पथदिवे बंद असल्याने रात्री सर्व गावात काळोख पसरत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. महावितरणने ताबडतोब ही जोडणी पूर्वव्रत करावी अशी मागणी देखील गायकवाड यांनी केली आहे. काळोख असल्याने फिरण्यासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांना काळोखात कुत्रे देखील त्रास देतात. तसेच चोरांचा धोका देखील संभवतो असे शिव-सेना पाली शहर प्रमुख प्रदीप (दादू) गोळे यांनी सांगितले.

> शासनाने पथदिवे सुरू करण्यासंदर्भात लागलीच दखल घेणे आवश्यक आहे. याचा हकनाक त्रास सामान्य जनतेला बसत आहे. रात्री व पहाटे बाहेर पडणाऱ्या लोकांना साप, विंचू आदी सरपटणारे प्राणी, हिंस्त्र श्वापदे यासंह चोरांची भीती वाढली आहे.
>
> **-प्रकाश पालकर , उपाध्यक्ष सुधागड वंचित सामाजिक विकास संस्था**

## पिसाळलेल्या कुत्र्यांची फुंडे गावात दहशत ; १० जणांना घेतला चावा

**दै.रायगड नगरी । अनंत नारंगीकर**

**जेएनपीटी** : फुंडे गावातील लहान मुले,तरुण, महिला असा प्रकारे एकूण १० जणांना पिसाळलेल्या कुत्र्यानी चावा घेतल्याने गावातील रहिवाशी भयभीत झाले आहेत. तरी पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी उरण पंचायत समितीने पुढाकार घ्यावा अशी मागणी फुंडे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

उरण तालुक्यात पुन्हा एकदा करोनाने डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे. त्यात गावा गावात भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडला आहे. सदर मोकाट फिरणारे कुत्रे हे रहिवाशांना जावा घेत असल्याच्या बातम्या रहिवाशांमध्ये ऐकण्यास मिळत आहेत. त्यात मंगळवार दि३० ते बुधवार दि३१ मार्च या दोन दिवसांत उरण तालुक्यातील फुंडे गावातील लहान मुले, तरुण आणि महिला अशा एकूण १० जणांना पिसाळलेल्या कुत्र्यांनी चावा घेतला आहे. सदर जखमी झालेले रहिवाशी उरण, नवीमुंबई, मुंबई शहरातील रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले आहेत.

एकंदरीत पिसाळलेल्या कुत्र्यांनी उच्छाद मांडल्याने लहान मुले, महिला या कुत्र्याच्या दहशतीमुळे घराबाहेर पडत नाहीत. तरी पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी उरण पंचायत समितीने पुढाकार घ्यावा अशी मागणी फुंडे ग्रामपंचायतीच्या वतीने उरण पंचायत समिती कडे देण्यात आलेल्या निवेदन पत्रकाच्या माध्यमातून करण्यात आली आहे.



**कोंडले येथील विद्यार्थींनी आकांक्षा रवींद्र पाटील हिने वाढदिवसानिमित्त मोरबे प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षकांना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मास्क व पेनचे वाटप केले. यावेळी मुख्याध्यापक मुरलीधर उपरे, मंगलदास पाटील, रवींद्र पाटील, स्नेहा पाटील, सिमा माळी, सत्यदेवी बनरकर तसेच शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.**

## आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नामफलकाचे अनावरण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

साई गणेश ईंटरप्रायजेसच्या कर्मचाऱ्यांनी जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे सदस्यत्व स्वीकारले आहे. त्याअंतर्गत नवीन पनवेल येथे युनीयनच्या नामफलकाचे अनावरण भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष तथा संघटनेचे सल्लागार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समिती व सभापती समीर ठाकूर, नगरसेविका राजेश्री वावेकर, संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, उपाध्यक्ष पांडुरंग पाटील, रवी नाईक, कार्यालयीन सचिव समीरा चव्हाण, जगदीश म्हात्रे, सरचिटणीस मोतीराम कोळी, चिटणीस विनायक मुंबईकर, राकेश भुजबळ आदी उपस्थित होते.

## पोलादपूरमध्ये छ.शिवजयंती उत्सव उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : तालुक्यातील साखर देऊळकोंड येथील स्वराज्य युवा प्रतिष्ठानतर्फे बुधवारी छ. शिवाजी महाराज जयंती निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यावेळी आबाल-वृध्द माता-भगिनींची उपस्थिती लक्षणीय होती.

सकाळी नरवीर तानाजी मालुसरे यांच्या उमरठ येथील समाधीस्थळापासून शिवज्योतीचे आगमन झाले. कोरोना काळात गेल्या वर्षीपासून उमरठ येथून शिवज्योत आणण्यास सुरुवात झाली असून यावर्षी नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तसेच नरवीरांच्या आणि शेलारमामांच्या समाधीस्थळी अभिवादन करून स्वराज्य युवा प्रतिष्ठानच्या पदाधिकारी तसेच युवक कार्यकर्ते आणि शिवप्रेमींनी शिवज्योत साखर येथील देऊळकोंड येथे आणण्यात आली. यावेळी महिलाभगिनींनी तसेच सुहासिनींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या



मुर्तीची पालखीतून मिरवणूक काढून शिवज्योतही सभास्थानी आणली.

सकाळी पुरोहित दीपक जंगम यांच्या उपस्थितीत छ.शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिषेक व माजी उपसरपंच पांडुरंग मालुसरे यांच्याहस्ते शिवप्रतिमापूजन करण्यात आले. यानंतर श्रीसत्यनारायणाची महापूजा स्वराज्य युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष जितेंद्र मालुसरे व त्यांच्या पत्नी भाग्यश्री मालुसरे यांच्याहस्ते यथाविधी करण्यात आली. दुपारी ११ वाजता मान्यवरांसह कोरोना योध्द्यांचा सत्कार सोहोळा आयोजित करण्यात आला असता स्थानिक मान्यवरांच्या उपस्थितीत कोरोना काळात गावामध्ये रूग्णांसह अन्य ग्रामस्थांना क्वारंटाईन करण्यासंदर्भातील दक्ष कार्यकर्ते व ग्रामस्थांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी स्वराज्य युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष जितेंद्र मालुसरे, उपाध्यक्ष राकेश चोरगे, रूपेश सोनाटे, मनेश मालुसरे, मंगेश बांद्रे, सुनील बांद्रे, अक्षय उतेकर, राजेश गायकवाड, निलेश मालुसरे, अनिल बांद्रे तसेच बोरजचे सरपंच पांडुरंग सुतार, उपसरपंच प्रकाश झाडाणे फौजदार तुकाराम साळवी आणि तंटामुक्ती अध्यक्ष आनंद मोरे आदी मान्यवरांनी कोरोना योध्द्यांचा सत्कार केला. यानंतर महाप्रसादाचा लाभ सर्व ग्रामस्थांनी घेऊन महिला भगिनींसाठी प्रचंड उत्साहात हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले. बुधवारी रात्री संगीत भजन व हरिपाठाचे आयोजन करण्यात आले असता सर्व महिला पुरूष ग्रामस्थांनी या आनंद सोहळ्यामध्ये भक्तीभावाने सहभाग घेतला.

## सामुहिक बलात्कार प्रकरणातील फरार आरोपी अखेर जेरबंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर येथील सामुहिक बलात्कार प्रकरणातील फरार असलेल्या मुख्य आरोपीला चेंबूर येथून अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. अभिषेक अजित खरात (३१) असे या आरोपीचे नाव असून ३ फेब्रुवारी अभिषेक आणि त्याचा साथीदार तेजस देवळेकर (१९) या दोघांनी आपल्या ओळखीतील १९ वर्षीय तरुणीवर सामुहिक लैंगिक अत्याचार करुन पलायन केले होते. त्यानंतर पोलिसांनी तेजसला अटक केली होती. तर अभिषेक फरार झाला होता.

सदर घटनेतील पिडीत तरुणी आणि तिच्यावर सामुहिक लैंगिक अत्याचार करणारे आरोपी सर्व खारघरमध्ये एकाच भागात राहणारे असून ते पिडीत तरुणीच्या ओळखीतील होते. ३ फेब्रुवारी रोजी रात्री पिडीत तरुणी रहात असलेल्या भागात हळदीचा कार्यक्रम असल्याने ती आई-वडीलांसह हळदीच्या कार्यक्रमासाठी गेली होती. यावेळी पिडीत तरुणीला तहान लागल्याने ती पाणी पिण्यासाठी गेली असताना, आरोपी अभिषेक आणि तेजस या दोघांनी तिला जवळच असलेल्या मिनी बसमध्ये नेऊन शितपेयात दारु मिसळून तिला पिण्यासाठी दिले होते. त्यामुळे पिडीत तरुणी बेधुंद झाल्यानंतर दोघांनी बसमध्येच तिच्यावर आळीपाळीने लैंगिक अत्याचार केला होता. त्यांनतर दोघांनी तिला अंधारात तळोजा भागात निर्जनस्थळी नेऊन सोडले होते. त्यानंतर पिडीत तरुणीने काही नागरिकांच्या मदतीने आपले घर गाठून घडल्या प्रकाराची माहिती आपल्या कुटुंबियांना दिली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवरुन पोलिसांनी अभिषेक आणि तेजस या दोघांवर सामुहिक बलात्काराचा गुन्हा दाखल करुन तेजस देवळेकर याला तत्काळ अटक केली होती. मात्र, या घटनेतील मुख्य आरोपी अभिषेक खरात फरार झाला होता. मागील दिड महिन्यांपासून खारघर पोलीस त्याचा शोध घेत होते. मात्र, तो पोलिसांना गुंगारा देत होता. अखेर आरोपी अभिषेक खरात चेंबूर येथील लाल डोंगर परिसरात लपून रहात असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर पवार यांना मिळाल्यानंतर त्यांनी चेंबूर पोलिसांना याबाबतची माहिती दिली होती. त्यानुसार चेंबूर पोलिसांनी लाल डोंगर परिसरातून अभिषेक याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर तो खारघर येथील सामुहिक बलात्कार प्रकरणातील आरोपी असल्याचे निष्पन्न झाले.

## कळंबोली येथील जुगारावर छापा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली स्टील मार्केट बीमा कॉम्प्लेक्सच्या मागच्या बाजूला सुरु असलेल्या जुगारावर कळंबोली पोलिसांनी छापा टाकला आहे. यावेळी पोलिसांनी आठ जणांना ताब्यात घेतले.

कळंबोली स्टील मार्केट, बीमा कॉम्प्लेक्सच्या मागच्या बाजूला जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार कळंबोली पोलिसांनी छापा टाकला असता या ठिकाणी सुरेश शेळके, पुष्पक स्वार, महेंद्र ओवे, संजय पोतेकर, रंजितसिंग संधू, सफूद्दीन शेख अली मोहंमद, बापूराव भोसले, विश्वनाथ सांगळे हे ८ इसम जुगार खेळताना सापडून आले. त्यांच्याकडून ६ हजार ९८० रुपये जप्त करण्यात आले आहेत.

## सभागृहनेते परेश ठाकूर यांच्याकडून तळोजात भुयारी मार्ग, कब्रस्तानची पाहणी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महापालिका हद्दीतील तळोजा येथील पाणी साठणार्या भुयारी मार्गाची तसेच कब्रस्तान व नाल्याची पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी बुधवारी पाहणी केली.

पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रातील अनेक समस्यांची पाहणी करून त्या सोडविण्याचे काम करण्यात येत आहे. त्या अंतर्गत ठाकूर यांनी बुधवारी तळोजा येथील भुयारी मार्गाची, तसेच कब्रस्तानची पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनी तळोजा येथे शिवजयंत्तीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक हरेश केणी, पापा पटेल, भाजप नेते निर्दोश केणी, संतोष पाटील, जगदिश घरत, विवेक केणी, जयंत घरत, सुनील पाटील आदी उपस्थित होते.